IASP 2025 GLOBAL YEAR
Pain Management, Research and Education in Low- and Middle-Income Settings
FACT SHEET

**अल्प आणि मध्यम उत्पन्न असलेल्या प्रवर्गांसाठी वेदना शिक्षण अभ्यासक्रम:**

**क्षमता वाढवण्यासाठी दोन मॉडेल्स**


**लेखक**

• नान्थासॉर्न झिन्बुनियाहगून [एमडी, महिदोल विद्यापीठ, थायलंड][१]

• प्रमोते युसोभोन [एमडी, एमएमएड, माहिडोल विद्यापीठ, थायलंड ][१]

• जोसेलिन क्यू [एमडी, मेडी], युनिव्हर्सिटी ऑफ सँटो टॉमस, फिलीपिन्स][२]


वेदना ही एक छुपी जागतिक आरोग्य समस्या आहे. वेदना ही वय, लिंग, उत्पन्न, वंश आणि भौगोलिक क्षेत्र यापलीकडे जाऊन सार्वत्रिक आढळणारी समस्या आहे. असं असलं तरी जागतिक स्तरावर वेदनेची समस्या असमान प्रमाणात आढळते [२]. अल्प आणि मध्यम उत्पन्न देशांमध्ये तीव्र आणि दीर्घकालीन वेदनेचा भार जास्त आहे आणि त्याचे उपचार हे अधिक आव्हानात्मक आहेत. वेदनेच्या उपचारातील हे अडथळे फक्त संसाधनांच्या अनुपलब्धेतून आलेले नाहीत, तर त्यासाठी आरोग्य व्यावसायिकांना वेदना व्यवस्थापनेचे असलेले अपुरे ज्ञान देखील कारणीभूत आहे[४,५].

सगळ्या आरोग्यसेवा केंद्रांसाठी व्यापक वेदना शिक्षणाची गरज ओळखून, आयएएसपी ने प्रत्येक आरोग्य-संबंधित विषयासाठी आयएएसपी कोर अभ्यासक्रमातील चार क्षेत्रांवर आधारित वेदना अभ्यासक्रमाची रूपरेषा विकसित केली आहे.[१,३] अभ्यासक्रमात किरकोळ फरक आहेत कारण सगळ्या विषयांना वेदना-संबंधित ज्ञान आणि कौशल्यांचा समान प्रकार आणि व्याप्ती आवश्यक नसते, जसे की भौतिकउपचार तज्ज्ञांना औषधनिर्माणशास्त्राचे सखोल ज्ञान आवश्यक नसते. या अभ्यासक्रमाचा उद्देश आंतरव्यावसायिक संघाचे सदस्य म्हणून वेदना व्यवस्थापन पुढे नेण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करणे आहे [३]. तथापि, देशांमध्ये शैक्षणिक रचना, आरोग्य सेवा प्रणाली आणि सामाजिक-सांस्कृतिक संरचनेत लक्षणीय फरक आहे. अल्प आणि मध्यम उत्पन्न देशांमध्ये कर्मचारी, उपकरणे आणि आर्थिक अडचणी वेदना सेवा, शिक्षण आणि प्रशिक्षण लक्षणीयरीत्या मर्यादित करतात.

या आव्हानांना तोंड देण्यासाठी, आयएएसपी अभ्यासक्रम क्षमतेवर आधारित शिक्षणावर केंद्रित आहे ज्यामुळे हा अभ्यासक्रम सगळ्या प्रकारच्या परिस्थित लागू होईल. स्थानिक व्यावसायिक आणि कार्यक्रमांच्या गरजा आणि तिथल्या आरोग्य प्राधान्यांनुसार योग्य असलेल्या कोणत्याही शैक्षणिक मॉडेल्स आणि धोरणांचा वापर करून ते कार्यक्रमांमध्ये एकत्रित केले जाऊ शकते. आम्ही अल्प आणि मध्यम उत्पन्न देशातील दोन अग्रगण्य वेदना शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रमांचे वर्णन शैक्षणिक मॉडेल्सची उदाहरणे म्हणून करतो जिथे आयएएसपी अभ्यासक्रम

पूर्णपणे एकत्रित केला गेला आहे. आग्नेय आशियातील वेदना शिक्षणाच्या सुरुवातीच्या मॉडेल्समध्ये सिरिराज क्लिनिकल पेन मॅनेजमेंट ट्रेनिंग सेंटर, बँकॉक, थायलंड आणि मास्टर इन पेन मॅनेजमेंट प्रोग्राम, सेंटर फॉर पेन मेडिसिन, फॅकल्टी ऑफ मेडिसिन अँड सर्जरी, युनिव्हर्सिटी ऑफ सँटो टोमस (यूएसटी), मनिला, फिलीपिन्स यांचा समावेश आहे. ही अनुक्रमे १९८९ आणि २००८ मध्ये स्थापित आहेत.

**सिरिराज क्लिनिकल पेन मॅनेजमेंट ट्रेनिंग प्रोग्राम**

सिरिराज क्लिनिकल पेन मॅनेजमेंट ट्रेनिंग सेंटर हे तृतीयक काळजी शिक्षण रुग्णालयात रुग्णांसाठी बहुविद्याशाखीय वेदना व्यवस्थापन सेवा देते. हे केंद्र गुंतागुंतीच्या तीव्र वेदना, कर्करोग वेदना, हाडांच्या आणि स्नायूंच्या दीर्घकालीन वेदना आणि न्यूरोपॅथिक वेदना यासह विविध वेदना परिस्थितींना संबोधित करते. हे एक शैक्षणिक केंद्र म्हणून देखील काम करते, इथे आशिया-पॅसिफिक प्रदेशातील अल्प आणि मध्यम उत्पन्न देशातील डॉक्टरांसाठी एक वर्षाचा क्लिनिकल वेदना व्यवस्थापन कार्यक्रम राबवविला जातो. २००८ पासून इंटरनॅशनल असोसिएशन फॉर द स्टडी ऑफ पेन आयएएसपी (IASP) आणि वर्ल्ड फेडरेशन ऑफ सोसायटीज ऑफ ॲनेस्थेसियोलॉजिस्ट डब्ल्यूएफएसए (WFSA) द्वारे समर्थित, या कार्यक्रमाने म्यानमार,

व्हिएतनाम, लाओस, कंबोडिया, इंडोनेशिया, नेपाळ [८] सारख्या अल्प आणि मध्यम उत्पन्न देशांत सेवा देणाऱ्या ३५ वेदना चिकित्सकांना प्रशिक्षण दिले आहे.

उच्च-उत्पन्न असलेल्या देशांच्या तुलनेत, अल्प आणि मध्यम उत्पन्न देशातील वेदना शिक्षण कार्यक्रमांमध्ये उच्च-किमतीच्या तंत्रज्ञानावर किंवा प्रगत हस्तक्षेपांवर भर देण्याऐवजी साध्या, कमी किमतीच्या उपचारांवर लक्ष केंद्रित केले जाते. हा अभ्यासक्रम आयएएसपी (**IASP**) अभ्यासक्रमाशी सुसंगत आहे, ज्यामध्ये मानक ज्ञानाचा बहु-विद्याशाखीय पाया आणि प्रशिक्षण कार्यक्रमाच्या मुख्य घटकांसह स्थानिक पारंपारिक औषधींचा देखील उपयोग केला जातो. या कार्यक्रमाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:

**1. व्यापक क्लिनिकल प्रशिक्षण आणि आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन**: प्रशिक्षणार्थींना दीर्घकालीन वेदना, तीव्र वेदना, मानसोपचार, पुनर्वसन आणि थाई पारंपारिक उपचार यामध्ये सखोल प्रशिक्षण दिले जाते. यासोबतच त्यांना वेदना मूल्यांकन, वेदनेचे औषधीय उपचार आणि वेदना व्यवस्थापन यांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. हा कार्यक्रम अनेक बहुविद्याशाखीय सहयोगातून समग्र वेदना व्यवस्थापन प्रदान करतो.

**2. संशोधन आणि शैक्षणिक लेखन**: प्रशिक्षणार्थींना संशोधन करण्यास आणि आणि ते संशोधन प्रकाशित करण्यास प्रोत्साहित केले जाते [६,७].

**3. मूल्यांकन आणि तपासणी**: हा कार्यक्रम एंट्रस्टेबल प्रोफेशनल ॲक्टिव्हिटी (**EPA**) आणि डायरेक्ट ऑब्झर्व्हेशन प्रोसिजर (**DOP**) मूल्यांकन चेकलिस्ट सारख्या क्लिनिकल कामादरम्यान लेखी आणि तोंडी परीक्षा, केस प्रेझेंटेशन आणि चेकलिस्ट यासारख्या अनेक पद्धती वापरून प्रशिक्षणार्थींच्या क्षमतांचे मूल्यांकन करतो.

**यूएसटी (UST) फॅकल्टी ऑफ मेडिसिन अँड सर्जरी - वेदना व्यवस्थापन पदव्युत्तर कार्यक्रम**

फिलिपाइन्सच्या मनिला येथील यूएसटी फॅकल्टी ऑफ मेडिसिन अँड सर्जरीच्या सेंटर फॉर पेन मेडिसिनद्वारे दिला जाणारा वेदना व्यवस्थापनातील मास्टर ऑफ मेडिसिन/मास्टर ऑफ सायन्स हा कार्यक्रम दोन वर्षांचा बहुविद्याशाखीय दूरस्थ शिक्षण पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम आहे. हा कार्यक्रम अनुक्रमे डॉक्टरांसाठी (मास्टर ऑफ मेडिसिन) आणि संबंधित आरोग्य व्यावसायिकांसाठी (मास्टर ऑफ सायन्स) आहे, जे दक्षिणपूर्व आशिया, भारत आणि पाकिस्तानचे नागरिक व रहिवासी आहेत आणि ज्यांना क्लिनिशियन, शिक्षक आणि संशोधक म्हणून वेदना व्यवस्थापन क्षेत्रात आपले ज्ञान वाढवायचे आहे.

२००६ च्या 'आयएएसपी इनिशिएटिव्ह फॉर इम्प्रूव्हिंग पेन एज्युकेशन इन डेव्हलपिंग कंट्रीज' अनुदानाद्वारे आणि सिडनी विद्यापीठासोबतच्या परवाना करारामुळे, हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम २००८ मध्ये सुरू करण्यात आला. या ऑनलाइन शैक्षणिक कार्यक्रमाच्या मुख्य घटकांमध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे:

१. **सर्वसमावेशक**, **प्रगत**, **पुरावा-आधारित आणि वैद्यकीयदृष्ट्या संबंधित अभ्यासक्रम,** जो वैद्यकशास्त्रासाठी वेदनांवरील **IASP** अभ्यासक्रम रूपरेषेचे पालन करतो [३].

२. **आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन**: यामध्ये प्राध्यापक आणि विद्यार्थी विविध शाखा आणि वैशिष्ट्यांमधून येतात आणि वेदनांच्या जैविक-मानसिक-सामाजिक पैलूंचा आणि वेदना व्यवस्थापनाच्या आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाचा अभ्यास करतात.

३. **संशोधन**: यामध्ये विद्यार्थ्यांना २ वर्षांच्या कार्यक्रमाच्या शेवटी एक प्रकल्प सादर करणे आवश्यक असते.

४. **मूल्यमापन आणि परीक्षा**: यामध्ये विद्यार्थी ऑनलाइन चर्चा, परस्पर संवादी स्वयं-मूल्यांकन प्रश्नमंजुषा, तोंडी सादरीकरणे आणि क्लिनिकल परिस्थितींवर आधारित असाइनमेंट्समध्ये सहभागी होतात.

५. **ऑनलाइन शिक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी मूलभूत संगणक साक्षरता कौशल्ये विकसित आणि वर्धित केली जातात.**

आजपर्यंत, या कार्यक्रमाने २९ मास्टर्स ऑफ मेडिसिन, ६ मास्टर्स ऑफ सायन्स (२ परिचारिका, ३ दंतवैद्य आणि १ कायरोप्रॅक्टर), ६ पदव्युत्तर डिप्लोमा आणि ७ पदव्युत्तर प्रमाणपत्र धारकांना पदवी प्रदान केली आहे, जे मलेशिया, थायलंड, इंडोनेशिया, भारत आणि फिलिपाइन्ससारख्या निम्न आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये सेवा देत आहेत.

**मुख्य परिणाम आणि माजी विद्यार्थ्यांचे यश**

या दोन्ही संस्था शिक्षण, प्रशिक्षण आणि संशोधनाद्वारे वेदना व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी वचनबद्ध आहेत, ज्याचा उद्देश अल्प आणि मध्यम-उत्पन्न देशांमधील (**LMICs**) रुग्णांचे उपचार आणि जीवनमान सुधारणे हा आहे. शिक्षण आणि प्रशिक्षणाचे अंतिम ध्येय केवळ वैयक्तिक डॉक्टरांना प्रशिक्षित करणे हे नाही, तर असे नेते किंवा मार्गदर्शक तयार करणे आहे जे त्यांचे ज्ञान सामायिक करतील आणि त्यांच्या मायदेशात आणि त्याही पुढे एक साखळी निर्माण करतील.

माजी विद्यार्थ्यांनी परिवर्तनकारी क्षमता दर्शविली आहे आणि त्यांनी त्यांच्या संस्था व समुदायांमध्ये वेदना व्यवस्थापन सुधारण्यासाठी प्रयत्न केले आहेत. यामध्ये बहु-अनुशासनात्मक दृष्टिकोन लागू करणे, वेदना व्यवस्थापनासाठी कार्यप्रणाली (प्रोटोकॉल) स्थापित करणे आणि ग्रामीण भागातील वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे शिक्षण वाढवण्यासाठी समुदाय संपर्क कार्यक्रम विकसित करणे यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, अनेक माजी विद्यार्थ्यांनी आवश्यक वेदना व्यवस्थापन कार्यक्रम सुरू करून, वेदनांविषयी जागरूकता वाढवून, राष्ट्रीय प्रसारणाद्वारे रुग्णांचे शिक्षण सुधारून, किंवा आपापल्या देशांमध्ये वेदना व्यवस्थापनामध्ये नेते म्हणून नियुक्त होऊन राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर वेदनांच्या समर्थनामध्ये सहभाग घेतला आहे [८].

**निष्कर्ष**

जागतिक वेदना व्यवस्थापनातील असमानता दूर करण्याच्या दिशेने हा अभ्यासक्रम एक महत्त्वाचे पाऊल आहे. आयएएसपी (**IASP**) अभ्यासक्रम अल्प आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये संबंधित आणि लागू करण्यायोग्य आहे. अद्ययावत वैद्यकीय ज्ञान, बहुविद्याशाखीय दृष्टिकोन आणि सांस्कृतिक व संसाधनांशी जुळवून घेण्याच्या क्षमतेचा मेळ घालून, हे अभ्यासक्रम जागतिक वेदना व्यवस्थापन सुधारण्यासाठी आदर्श म्हणून काम करू शकतात.

**संदर्भ**

**References**

1. Fishman et al. Core competencies for pain management: Results of an interprofessional consensus summit. Pain Medicine 2013; 14:971-981.

2. Goldberg DS, McGee SJ. Pain as a global public health priority. BMC Public Health. 2011; 11:770.

3. International Association for the Study of Pain. IASP Curriculum Outline on Pain for Physical Therapy. Available at: https://www.iasp-pain.org/education/curricula/iasp-curriculum-outline-on-pain-for-physical-therapy, retrieved 01/03/2025

4. Kopf A, Patel N, editors. Obstacles to pain management in low-resource settings. In: Guide to Pain Management in Low-Resource Settings. International Association for the Study of Pain; 2010. p. 9-12.

5. Morriss WW, Roques CJ. Pain management in low- and middle-income countries. BJA Educ. 2018;18(9):265-270.

6. Sanansilp V, Euasobhon P, Than QV, Rushatamukayanunt P, Jirachaipitak S, Eiamtanasate S. Effectiveness of the Four-Frequency Protocol of Repetitive Peripheral Magnetic Stimulation (rPMS) for Chronic Pain. Siriraj Med J 2022;74(8):518-529.

7. Thapa P, Euasobhon P. Chronic postsurgical pain: current evidence for prevention and management. Korean J Pain. 2018;31(3):155-173.

8. Zinboonyahgoon N. Siriraj Clinical Pain Management Center's report to IASP 2012-2024. (unpublished report)

**लेखक संलग्नता Author Affiliations:**

१. सिरीराज क्लिनिकल पेन मॅनेजमेंट ट्रेनिंग सेंटर, ॲनेस्थेसियोलॉजी विभाग, फॅकल्टी ऑफ मेडिसिन सिरीराज हॉस्पिटल, महिडोल विद्यापीठ, थायलंड

२. सेंटर फॉर पेन मेडिसिन, ॲनेस्थेसियोलॉजी आणि पेरिऑपरेटिव्ह मेडिसिन विभाग, फॅकल्टी ऑफ मेडिसिन अँड सर्जरी, युनिव्हर्सिटी ऑफ सँटो टॉमस, फिलिपिन्स

**माहिती पत्रकाचे पुनरावलोकन करणारे:**

रॉजर गौके एफएफपीएमएएनझेडसीए, एमबी सीएचबी, युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया, पर्थ, ऑस्ट्रेलिया

क्वेन व्हॅन थान, एमडी, पेन क्लिनिक, हॉस्पिटल १९९, ॲनेस्थेसियोलॉजी विभाग, व्हिएतनाम

**Translated from English by:**

Vaibhavi Walimbe (PT, PhD Scholar, Department of Musculoskeletal Physiotherapy, MGM School of Physiotherapy, Chhatrapati Sambhajinagar, Maharashtra, India)

**भाषांतर:**

वैभवी वाळिंबे (पीटी, पीएचडी स्कॉलर, मस्क्युलोस्केलेटल फिजिओथेरेपी विभाग, एमजीएम स्कूल ऑफ फिजिओथेरेपी छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र, भारत)